महाराष्ट्र टाईम्स
९ जून २०२०

# २७ हजार सदस्यांची कार्यशाळेसाठी नोंदणी

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

## 'ज्ञानसाधना'ने सर्व कॉलेजांचा विक्रम मोडला

ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजच्या वतीने 'ऑफलाइन ते ऑनलाइन अध्यापनात विकास' या विषयावर पाच दिवसीय प्राध्यापक विकास कार्यशाळा माहिती व तंत्रज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक (प्रादेशिक केंद्र मुंबई) आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यातर्फे नुकतीच घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी कॉलेजने २७,१२० सदस्यांची नोंदणी करून जगातील सर्व कॉलेजचा विक्रम मोडला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणकर आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन यांच्या हस्ते झाले. यामध्ये २२ देशांतील तज्ज्ञ, शिक्षक आणि प्रशिक्षक सहभागी झाले.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या प्रथम सत्रात डॉ. शुभांगी पाटील यांनी 'पॉवर पॉइंटमध्ये ॲनिमेशनची निर्मिती' या विषयावर आणि ॲनिमेटेड पीपीटी तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात नरेंद्र जोशी यांनी ई-सामग्री विकासासाठी मुक्त विद्यापीठाने केलेल्या प्रयत्नांबद्दल सांगितले. दुसऱ्या सत्रात भाव्या आहुजा-ग्रोव्हर यांनी 'गुगल क्लासरूम' एक शिक्षण व्यवस्थापन प्रणालीची ओळख प्रात्यक्षिकांसह करून दिली.

तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात अमित चौधरी यांनी व्हर्च्युअल क्लासरूम सॉफ्टवेअर आणि त्याची वैशिष्ट्ये या विषयांवर माहिती दिली. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. अर्जुन पी. घाटुळे यांनी 'व्हर्च्युअल क्लासरूम : न्यू नॉर्मल' या विषयावर मार्गदर्शन केले. चौथ्या दिवशी डॉ. योगेंद्र पाल यांनी 'यूट्यूब व्हिडीओ आणि ब्लेंडेड क्लासरूम' हा विषय आणि ओबीएस सॉफ्टवेअरची ओळख करून दिली. दुसऱ्या सत्रात डॉ. जनार्दन यांनी 'तंत्रज्ञान शिक्षण' या विषयावर व्याख्यान दिले. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी नितीन पाहवा आणि नीती सोटा या दोघांनी 'मायक्रोसॉफ्ट समवेत प्रशिक्षण' या विषयावर माहिती दिली.

ठाणे वैभव
२६ जून २०२०

# ई-लर्निंग:ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडब्रँड

## सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**ठाणे: सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आणि ठाणे- मुंबई विद्यापिठाचे वाणिज्य विभागा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर 'ई-लर्निंग:ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडब्रँड.' ह्या वेबिनारचे आयोजन करण्यात येत आहे.**

कोरोनासारख्या विश्वव्यापी संकटकाळात शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी 'ई-लर्निंग कौशल्ये' आत्मसात करणे गरजेचे आहे. हा मुख्य हेतू लक्षात घेऊन महाविद्यालयाने हाती घेतलेल्या या राष्ट्रस्तरीय उपक्रमाचा लाभ विद्यार्थांना विनामूल्य घेता येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि बौद्धिक विकासास पुरक अभ्यासविषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यक्रमाचा कालावधी 30 जून ते 6 जुलै असा असून, त्यामधे स्ट्रेस आणि मोटीवेशन, सायबर सीक्युरीटी, ई-बँकिंग आणि पेमेंट ॲप्स, एम. एस. वर्ड, एम. एस. एक्सेल, ऑनलाइन प्लॅटफॉर्म, फ्री ॲप्स आणि मोबाइल विडिओ मेकिंग, गुगल क्लासरुम, कंन्टेंट राईटींग आणि डिजिटल मार्केटींग अशा विषयांवर तज्ञांद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नववी ते अगदी पदव्युत्तर स्तरापर्यंतचे विद्यार्थी या वेबिनारमध्ये सहभागी होऊ शकतात.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/4my6C7naMaE3YXyDA या लिंकवर जावून विद्यार्थ्यांनी विनामूल्य नावनोंदणी करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना 29 जूनला रात्री नऊ वाजेपर्यंत नावनोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या https://www.dnyanasadhanacollege.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

ठाणे वैभव
4 जुलै 2020

# 'ई लर्निंग:- ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडबँड' उपक्रमाला मोठा प्रतिसाद

**ठाणे: सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे आणि मुंबई विद्यापिठाच्या वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'ई-लर्निंग : ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडब्रँड.' ह्या वेबिनारचे तब्बल 26 हजार विद्यार्थ्यांच्या साक्षीने उद्घाटन झाले. दोन दिवस विविध विषयांवर कार्यक्रम यशस्वी पार पडला.**

या उपक्रमाच्या ई- उद्घाटन समारंभापूर्वी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मराठे यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी महाविद्यालयाच्या महत्त्वपूर्ण पैलूंची ओळख करुन दिली. याप्रसंगी त्यांनी, संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, खजिनदार सतीश सेठ, व्यवस्थापन सदस्य मानसी प्रधान यांच्या मार्गदशनातूनच नित्य-नवे उपक्रमाच्या आयोजनाचे बळ मिळते हे आवर्जून सांगितले. यावेळी आयटी विभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी बनवलेल्या महाविद्यालयाच्या ॲपचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते झाले.

'ई लर्निंग:- ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडबँड' या उपक्रमाच्या उद्घाटनावेळी मुंबई विद्यापिठाच्या वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.कीन्नरी ठक्कर आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या अध्यक्षा डॉ.शकुंतला काळे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी 'सायबर सुरक्षा' व 'इंटरनेट बँकींग आणि पेमेंट ॲप्स' यांसारख्या अलिकडच्या काळातील अतिमहत्त्वाच्या विषयांवरील माहितीपूर्ण व्याख्यानांचा लाभ विद्यार्थ्यांना घेता आला. सायबर सुरक्षा हा विषय सायबर लॉ कन्सल्टींगचे संस्थापक निष्णात वकील डॉ. प्रशांत माळी यांनी अगदी सखोलपणे मांडला. अलीकडेच शासनाने काही चिनी ॲप्सच्या वापरावर निर्बंध लादले, याकडे लक्ष वेधून अशा ॲप्सचा अनधिकृत वापर करणे, इतरांच्या बँक खाते, फेसबूक व इतर सोशल नेटवर्कींग साईटस वरील माहितीचा अनधिकृतपणे वापर करणे हे सायबर गुन्हे असून यासंदर्भातील माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम- 43 ए, 66, 69 डॉ.माळी यांनी विस्ताराने सांगिले. अतिवापर नसलेले ॲप्स शक्यतो डाऊनलोड करु नये, सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या विनामूल्य वायफायचा वापर टाळावा, असा सूचक सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

लोकमत
दि: ६ जुलै 2020

महेश बेडेकर यांचे आवाहन : ई-लर्निंग : ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडबॅण्ड वेबिनार

# जीवनातील आव्हानांना धैर्याने तोंड द्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सुप्रसिद्ध स्त्री-रोगतज्ज्ञ, ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळाचे सदस्य व मॅरेथॉन धावपटू डॉ.महेश बेडेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अर्धी मॅरेथॉन, पूर्ण मॅरेथॉन या मॅरेथॉनच्या प्रकारांत धावपटू म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट, आहाराच्या बाबतीत पाळलेली पथ्ये, नियमित व्यायामाची स्वयंशिस्त हा संपूर्ण प्रवास त्यांच्या सहज-संवादातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना एखादा छंद जोपासा, अपयशातून शिका, जीवनातील आव्हानांना धैर्याने तोंड द्या असा प्रेरणादायी सल्ला दिला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे आणि मुंबई विद्यापिठाच्या वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'ई-लर्निंग : ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडब्रँड.' या वेबिनारच्या पाचव्या दिवशी शनिवारी विविध ऑनलाइन व्यासपीठ आणि ई लर्निंग कोर्सेस या व्याख्यानाचा आणि विविध क्षेत्रातील यशवंतांच्या अनुभवकथनाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला. सुरुवातीला भारतीय जीवन कौशल्य शिक्षण संघटनेतै सदस्य म्हणून, तसेच अनुभवात्मक शिक्षण केंद्रात' प्रशिक्षण सहकारी नचिकेत जोशी यांनी सामान्यत: वापरात असलेल्या व शिक्षणक्षेत्राशी संलग्न ॲप्सव्यतिरिक्त स्लॅक ॲप, एव्हरनोट यांसारख्या वेगळ्या ॲप्सविषयी सविस्तरपणे माहिती दिली. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध मार्गदर्शक रिषभ कालिया, झुफ सॉफ्टवेअर सोल्युशनचे व्यवस्थापकीय संचालक स्मितेश मोरे, स्त्री-रोगतज्ज्ञ, डॉ. बेडेकर आणि अभिनेते आदित्य पांडे यांनी आपला प्रवास उलगडला. शाळा, महाविद्यालयाच्या चार भिंतींपलीकडच्या शिक्षणाचा ध्यास घ्या, स्वानुभवातून शिका, कमी वयातच ध्येय निश्चित करुन त्याचा प्रयत्नपूर्वक मागोवा घ्या, ध्येयनिश्चिती झाल्यानंतर ते गाठण्यासाठी अविरत कष्ट करा, असा सल्ला रिषभ यांनी दिला.

## यशाचा पाठलाग करा!

यानंतर मोरे यांनी सांगितले की, अपयशाने खचून जाऊन माघार न घेता, अपयशाची कारणे शोधून, त्याचे विश्लेषण करून, त्यातून यशोमार्ग शोधण्याचा प्रयत्न केल्यास यशाची चव हमखास चाखता येते. अभिनेते पांडे म्हणाले, अभिनयक्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी खूप मेहनत करणे आवश्यक आहे. या क्षेत्रातील स्पर्धेत स्वत:ला टिकवून ठेवण्यासाठी दुर्दम्य महात्त्वाकांक्षा बाळगणे गरजेचे आहे. नवोदितांनी स्वत:ला सिद्ध करण्यासाठी अपयश पचवून यशाचा सदैव प्रयत्नपूर्वक पाठलाग करण्याची जिद्द बाळगावी.

लोकसत्ता
दि. ८ जुलै २०२०.

हुरीया यांचे मत : ई-लर्निंग : ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडबँड अध्ययन

# इतरांच्या संकेतस्थळावरील माहितीचे अनुकरण हा गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : स्वत:चे अनुदिनी खाते, संकेतस्थळ कसे तयार करावे, याबाबत मार्गदर्शन करताना मजकूर लेखन या विषयावर डिजिटल विपणन क्षेत्रातील वॅट कन्सल्टंट या कंपनीत व्यस्थापक म्हणून कार्यरत असलेल्या काजल हुरीया यांनी आपल्या वैयक्तिक अनुदिनी किंवा संकेतस्थळावरील माहिती ही पूर्णत: स्वरचित असावी, इतर कुणाचेही अनुकरण करणे हा गुन्हा ठरतो, असे सांगितले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे आणि मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सात दिवसीय ई-लर्निंग : ब्लॅकबोर्ड टू ब्रॉडबँड या विनामूल्य ऑनलाइन विद्यार्थी अध्ययन विकास कार्यक्रमात तब्बल २८१७८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

हुरीया यांनी आपल्या क्षमता जाणून ई-व्यवसाय करू इच्छिणाऱ्या नवोदितांसाठी यु-ट्युब, इन्स्टाग्राम, अनुदिनी यांसारखी अनेक नेटवर्किंग साइटस प्रारंभीचे एक व्यासपीठ म्हणून उपयुक्त ठरतात, असे त्या म्हणाल्या. यानंतर त्यांनी स्वत:चे यु-ट्युब चॅनेल कसे तयार करावे, स्वत:मधील कौशल्यगुण ओळखून त्यावर आधारित, प्रभावी व इतरांना आकर्षित करून घेण्याची क्षमता असलेल्या मजकुराच्या साहाय्याने व्हिडीओ कसे तयार करावे, यु-ट्युब चॅनेलच्या मदतीने पैसे कसे मिळवावेत व त्यासंबंधीचे निकष काय आहेत याबाबत मार्गदर्शन केले.


दुसऱ्या सत्रात कॉर्पोरेट ट्रेनर जास्मिन दावडा यांनी डिजिटल विपणन या विषयावर विद्यार्थ्यांशी संपर्क साधला. कॅनवा.कॉम या संकेतस्थळाच्या साहाय्याने आपल्या व्यवसायाला गती देण्यासाठी प्रभावी व आकर्षक मजकूर कसा तयार करावा ते प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले, तसेच आपले परिचयपत्र, वैयक्तिक संकेतस्थळ, लोगो यांसारख्या अनेक बाबी कॅनवा.कॉमच्या मदतीने सहज आकर्षक करता येतात याची माहिती त्यांनी दिली.

## संकेतस्थळांच्या वापराबाबत मार्गदर्शन




गुगल व पिक्साबे.कॉम, अनस्पाश.कॉम, फ्रीपीक.कॉम या संकेतस्थळांच्या मदतीने कॉपीराईट फ्री आणि विनामूल्य छायाचित्रे मिळवता येतात, रेंडरफॉरेस्ट.कॉम या संकेतस्थळाच्या मदतीने आकर्षक व्हिडीओ कसा तयार करावा, तसेच कॅनवा.कॉम मधील फ्रेम्स, शेप्स, स्टीकर, चार्ट, बॅकग्राउंड इ अनेक बाबी प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने समजावून सांगितले. निरोप समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आनंद व्यक्त केला.

दै. लोकसत्ता
दि. २९/७/२०२०






लोकमत
दि. ३०/७/२०२०.

# SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE

(ARTS, SCIENCE & COMMERCE)

**ADMISSIONS OPEN**

**NAAC Reaccredited with CGPA of 2.69 Grade B +**



**BAF**
B.Com.(Bachelor of Accounting & Finance)

**BBI**
B.Com.(Bachelor of Banking & Insurance)

**BAMMC**
(B.A. in Multimedia & Mass Communication)

**BMS**
B.A.( Bachelor of Management Studies )

**B.Sc.-C.S.**
B.Sc.( Bachelor of Computer Science )

**B.Sc.-I.T.**
B.Sc.( Bachelor of Information Technology )

**B.A.-FTNMP**
B.A.( Bachelor of Film TV & New Media Production )

Off Eastern Express Highway, Dnyanasadhana Marg, Thane (W) - 400 604.
Tel. : 022 - 25821615 / 25830722,
Fax : 022 - 25801999
E-mail : dnyanasadhanacollege@gmail.com
Website : www.dnyanasadhanacollege.org

Follow us on
Like us on Facebook
YouTube

COLLEGE CODE 043

लोकमत
3 ऑगस्ट 2020

सोजल सावंत यांचे मत : वेबिनारमध्ये विद्यार्थ्यांना ॲप्सचे मार्गदर्शन

# कोरोनामुळे सामाजिक एकात्मतेचेही पटले महत्त्व!

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : कोरोनामुळे उद्भवलेल्या या संकटकाळात कुटुंबीयांबरोबरच आपल्याला सामाजिक एकात्मतेचेही महत्त्व पटले आहे. नैराश्याच्या काळात स.प्र. ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विश्वातील सर्व शिक्षक-विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणिवेने साकारलेला हा उपक्रम निश्चितच प्रशंसनीय आहे, असे कौतुकोद्गार सोजल सावंत यांनी काढले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विद्यार्थी समितीच्या वतीने योग्य सामाजिक अंतराच्या या युगात 'विविध कलागुणांचे अनुसरण' या उद्देशाने द क्विंटेट ऑफ आर्टिस्ट्री (कलात्मक पंचकडी) या नावाने पाचदिवसीय कलात्मक वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमाच्या पहिल्या दिवशी उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. या उपक्रमासाठी भारतातीलच नव्हे, तर नेपाळ, यूके, कुवेत, भुतान, सौदी अरेबिया, हाँगकाँग या राष्ट्रांतील असंख्य विद्यार्थी व शिक्षकांनी नावनोंदणी करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांनी दिली.

उद्घाटनानंतर नॉलेज ब्रिज या संस्थेतील कार्यक्रम प्रशिक्षक भूषण सावंत यांनी 'व्हिडीओ गॅरेज' हा विषय मांडताना व्हिडीओ व ऑडिओचे सर्व घटक सविस्तरपणे मांडले. व्हिडीओ बनविण्याच्या काही सोप्या पद्धती त्यांनी समजावून सांगितल्या. आपल्या मोबाइलवरील काही सेटिंग वापरून व्यावसायिकदृष्ट्या उत्कृष्ट व्हिडीओ सहजपणे बनवता येतात. त्यासंदर्भात महाजालावर सहजपणे विनामूल्य उपलब्ध असलेल्या लेक्सिस ऑडिओ एडिटर, सिनेमा एफ ५, ओपन कॅमेरा ॲडॉसिटी या ॲपची परिपूर्ण माहिती दिली. काइनमास्टर, पॉवर डायरेक्टर या ॲप्सच्या साहाय्याने व्हिडीओ एडिटिंग कसे करावे, ते प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने समजावले.

## यू-ट्युबवर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

पीपीटी सादरीकरणाला स्क्रीन रेकॉर्डिंग ॲपच्या मदतीने आकर्षक व्हिडीओचे रुप देता येते. एकही सबस्क्रायबर नसतानाही स्ट्रीमल अब्स या ॲपच्या मदतीने यू-ट्युबवर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करता येते. अशा अनेक अज्ञात बाबींची माहिती या सत्रात शिक्षक-विद्यार्थ्यांना मिळाली. आजच्या कार्यक्रमाची संपूर्ण सूत्रे विद्यार्थ्यांनी सांभाळली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्ञानसाधनाचे माजी विद्यार्थी पंकज पितळे व भटू सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र टाइम्स
10 ऑगस्ट 2020

# ठाण्यातील कॉलेजांत ऑनलाइन वर्ग सुरू

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

लॉकडाऊनमध्ये शिथिलता आणल्यानंतर ठाण्यातील कॉलेजांमधील शैक्षणिक कामकाज सुरू झाले आहे. ठाण्यातील जवळपास ९० टक्क्यांहून अधिक कॉलेजांनी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षांचे वर्ग सुरू केले आहेत. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वेगवेगळ्या कल्पना वापरून ऑनलाइनच्या माध्यमातून शिक्षणाचे धडे देण्यास सुरुवात झाली आहे.

गेल्या महिन्यात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांनुसार वर्ग सुरू करण्याबाबत उच्चशिक्षण विभागाने विद्यापीठ आणि महाविद्यालयांना सांगितले होते. त्यानुसार कॉलेजांनी द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षांचे वर्ग भरवण्यास सुरुवात केली आहे. तर काही महाविद्यालयांनी प्रायोगिक तत्त्वावर ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. याला विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून शिक्षकही ऑनलाइन शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण घेत आहेत. सर्व प्राध्यापकांना यासाठी तंत्रस्नेही

### ७५ टक्के विद्यार्थ्यांचा सहभाग, प्राध्यापकांना प्रशिक्षण

करण्यात आले. काही कॉलेजांनी स्वतःची ऑनलाइन शिक्षणाची यंत्रणा तयार केली असून ऑनलाइन वर्गांना विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

ठाण्यातील जोशी बेडेकर कॉलेज, ज्ञानसाधना कॉलेज, आनंद विश्व गुरुकुल कॉलेज, एनकेटी, बांदोडकर कॉलेज, ज्ञानगंगा यासह अनेक कॉलेजांनी ७ ऑगस्ट पासून ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. या ऑनलाइन वर्गात ७५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत. ठाण्यातील बेडेकर कॉलेजात जी सूटच्या माध्यमातून एकाच वेळी २०० विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग देऊ शकता येतील असे तंत्रज्ञान वापरले जात आहे. याचबरोबर नेहमीच्या वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइन वेळापत्रक चालवण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे कॉलेजच्या प्राचार्य सुचित्रा नाईक यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स
28/08/2020



# CELEBRATING 40 GLORIOUS YEARS OF TRADITION, EXCELLENCE & MODERNITY

40 GLORIOUS
CELEBRATING 40 YEARS OF TRADITION, EXCELLENCE & MODERNITY
SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE
1980-2020

Dnyanasadhana Thane Society's

## SATISH PRADHAN DNYANASADHANA COLLEGE, THANE

**(Arts, Science and Commerce)**

Re-Accredited (3rd Cycle) by NAAC with 'B+' Grade (CGPA 2.69)

### XI & XII COURSES OFFERED

**XI Commerce (Aided) - English Medium**
College Online Code: Aided-MU340CGE
(No. of seats 720)

**XI Commerce (Unaided) - English Medium**
College Online Code: Unaided-MU340CPE
(No. of seats 480)

**XI Science (Aided) - English Medium**
College Online Code: Aided-MU340SGE
(No. of seats 480)

**XI Science (Bi-Focal:Computer Science) - English Medium**
College Online Code: Unaided-MU340SPE
(No. of seats Bio-20, CS-100)

**XI Arts (Aided) - Marathi Medium**
College Online Code: Aided-MU340AGM
(No. of seats 360)

### UG DEGREE Self-Financed Courses – Duration: 3 Years

(Affiliated to University of Mumbai)

**BAF (Bachelor of Commerce - Accounting & Finance)**

**BBI (Bachelor of Commerce - Banking and Insurance)**

**BMS (Bachelor of Commerce - Management Studies)**

**B.Sc. IT (Bachelor of Science - Information Technology)**

**B.Sc. CS (Bachelor of Science - Computer Science)**

**B.A. MMC (Bachelor of Arts - Multimedia & Mass Communication)**

**B.A. FTNMP (Bachelor of Arts - Film, Television and New Media Production)**

### UG DEGREE Aided Courses – Duration: 3 Years

(Affiliated to University of Mumbai)

**B.Com. (Bachelor of Commerce) - English Medium**

**B.Sc. (Bachelor of Science) - English Medium**

**B.A. (Bachelor of Arts) - Marathi Medium**

### PG DEGREE Self-Financed Courses

(Affiliated to University of Mumbai)

**M.Com. - Advanced Accountancy**
**M.Com. - Business Management**
**M.Sc.- Botany (By Paper)**
**M.Sc.- Chemistry (By Paper)**
**M.Sc.- Chemistry (By Research)**
**Ph.D. in Chemistry**
**Ph.D. in Commerce**

## ADMISSIONS OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2020 - 2021

Address: Off Eastern Express Highway, Dnyanasadhana Marg, Thane (W) 400604, Maharashtra, India.
Tel.: 022-25821615 / 25830722 e-mail: dnyanasadhanacollege@gmail.com Website: www.dnyanasadhanacollege.org

लोकमत - दि. ५ जाने. २०२१.

लोकमत

epaper.lokmat.com 3

मुंबई, मंगळवार, दि. ५ जानेवारी २०२१

# नवीन शिक्षण धोरण सर्वांसाठी अडचणीचे

## चंद्रशेखर मराठे : सावित्रीबाई फुले व्याख्यानमालिका

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणातही परिवर्तनाची गरज होती, म्हणून १९७५ नंतर बऱ्याच मोठ्या काळानंतर आलेल्या नवीन शिक्षण धोरणांकडून खूप अपेक्षा होत्या. पण विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षण संस्थांच्या दृष्टीने विचार केला तर या धोरणात प्रस्तावित केलेले बदल कसे अंमलात आणायचे याबद्दल कोणतीही स्पष्टता नाही. यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीविषयी विशेषतः ११वी, १२वीबाबत गोंधळाचे वातावरण आहे, असे प्रतिपादन सतीश प्रधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांनी केले.

समता विचार प्रसारक संस्था आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व्याख्यानमालिकेच्या उद्घाटनावेळी प्राचार्य मराठे बोलत होते. या वेळी ते म्हणाले, मोठ्या महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांबाबत काय धोरण असेल, याबाबत संदिग्धता आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी काही विशेष सोयीसवलती या धोरणात स्पष्ट नाहीत. अशा रीतीने हे नवीन शिक्षण धोरण अनेक अंगाने सर्वांसाठी अडचणीचे आहे.

या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय मंगला गोपाळ म्हणाले, 'सगळा देश लॉकडाऊनच्या काळात घरात बंदिस्त असताना, संसदेत चर्चा न करता घिसाडघाईने आदेश काढून मंजूर केलेले हे शिक्षण धोरण मुळातच लोकशाहीच्या संकेताविरुद्ध लागू केले गेले आहे. संविधानानुसार शिक्षण हा विषय केंद्र आणि राज्य सामायिक आहे. परंतु यापुढे ही तरतूद रद्द करून शिक्षणाच्या केंद्रीकरणाचा संविधानविरोधी घाट घातला जाणार आहे.'



### उद्योगांचा शिक्षणातील हस्तक्षेप वाढेल

- नव्या धोरणात नमूद केल्याप्रमाणे शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञानाचा, ऑनलाइन अभ्यासाचा वापर हा या सरकारच्या खाजगीकरणाला उत्तेजना देण्याच्या व्यापक धोरणाचाच एक भाग आहे. मोठ्या उद्योगांचा शिक्षणातील हस्तक्षेप वाढेल आणि त्यांच्या नफेखोरीच्या प्रवृत्तीने शिक्षण सामान्य माणसांच्या कुवतीबाहेर जाईल.
- शिक्षणात आधीच पुढे असलेला समाज त्यांना सहज उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांमुळे आणखीन पुढे जाईल आणि मुळातच आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेला वंचित समाज या सोयीसुविधा घेण्याची ऐपत नसल्याने व शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे राखीव जागा निरर्थक ठरणार असल्याने शिक्षणातून बाजूला पडेल आणि अजूनच मागे जाईल, अशी सार्थ भीती वाटते.

# नव्या शिक्षण धोरणामुळे बालमजुरी वाढण्याचा धोका

## मीनल उत्तुरकर : सर्वांना शिक्षण मिळावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** इयत्ता ६ वी ते ८ वी या बालवयात कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षणाचा अंतर्भाव केल्याने खेड्यातील मुले ८ वीनंतर शाळा सोडून बालमजुरीकडे वळतील, अशी दाट शक्यता वाटते. याबद्दल सर्वसामान्यांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे, असे मत समता विचार प्रसारक संस्था आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व्याख्यानमालिकेत संस्थेच्या कार्यकर्त्या मीनल उत्तुरकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात त्या पुढे म्हणाल्या की, संविधानाने शिक्षण हे मूलभूत हक्कात गणले आहे. त्यामुळे सर्व समाजघटकांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यासाठी शालेय शिक्षणाचा सर्व खर्च उचलणे, ही सरकारची संविधानिक जबाबदारी आहे.

पण, या सरकारने गावागावांतील, खेड्यापाड्यांतील लहान शाळा कमी विद्यार्थीसंख्येमुळे बंद करून तालुका पातळीवर खाजगी उद्योगांच्या परोपकार निधीच्या साहाय्याने मोठी शिक्षण संकुले उभारण्याचे या धोरणात नमूद केले आहे. लहान गावातील, आदिवासीपाड्यातील मुले, विशेषतः मुली दूरच्या शाळेत पाठवण्यास पालक संकोचतील आणि या मुलांची शाळा बंद होऊन मुले शिक्षणाला पारखी होतील, अशी भीती वाटते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या सहसचिव अनुजा लोहार आणि प्रास्ताविक एकलव्य कार्यकर्ती दुर्गा माळी यांनी केले. संस्थेच्या अध्यक्ष मनीषा जोशी आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य मराठे हे यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला इस्लामचे अभ्यासक प्राचार्य हुसैन मणियार, मकसुद खान, कोळीवाडा संवर्धन समितीचे डॉ. गिरीश साळगावकर, इंटकचे सचिन शिंदे, वृषाली कुलकर्णी, 'जाग'चे मिलिंद गायकवाड, शिवाजी पवार, उमाकांत पावसकर, शैलेश मोहिले आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान या व्याख्यानमालिकेतील पुढचे व्याख्यान १० जानेवारीला होणार असून त्यात मुख्य वक्ते डॉ. संजय मंगला गोपाळ असणार आहेत, अशी माहिती समता विचार प्रसारक संस्थतर्फे देण्यात आली.

### 'परिवर्तन समतेला धरून हवे'

- संस्थेचे विश्वस्त ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगदीश खैरालिया यांनी आभारप्रदर्शन करताना म्हटले की, या सरकारच्या जातीधर्मातील भेदभावाला, विषमतेला उत्तेजना देण्याचा उद्देश या धोरणातही दिसून येतो.
- परिवर्तन गरजेचे असले तरीही ते समता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या संविधानिक मूल्यांना धरून असले पाहिजे. ते या नवीन शिक्षण धोरणात दिसत नाही.

लोकमत
दि. २० जाने. २०२१



अपेक्षांचे बजेट

# कार्यप्रणाली एकतंत्री असायला हवी

कोरोनामुळे फटका बसलेल्या अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजनांवर भर देणारा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला सादर होईल. या अर्थसंकल्पातून आपल्या वाट्याला काही ना काही यावे, अशी प्रत्येक क्षेत्राची अपेक्षा आहे. काय आहे, या क्षेत्रांचे मागणे? त्यावर त्या-त्या क्षेत्रातील मान्यवरांची भूमिका...



शिक्षण व्यवस्थेची कार्यप्रणाली एकतंत्री असायला हवी. अनुदानित व विनाअनुदानित शिक्षण संस्था यांसारखे अडथळे नसावेत. आर्थिक निकषावर आधारित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, सवलतींचा लाभ घेता यायला हवा.

- **कमलेश प्रधान**, विश्वस्त आणि सचिव, ज्ञानसाधना, ठाणे



नवीन धोरणात जी उद्दिष्टे आहेत, त्यासाठी सरकारने पुरेशी तरतूद करणे अपेक्षित आहे. ही रक्कम जीडीपीच्या कमीतकमी ४ टक्के तरी असावी. पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्रथमच औपचारिक शिक्षणात प्रवेश झाला आहे, त्यासाठी विशेष तरतूद असावी.

- **सुरेंद्र दिघे**, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ



शाळांना भौतिक सुविधा पुरवण्यासाठी आणि देखभालीसाठी तरतूद गरजेचे आहे. शाळांमध्ये स्मार्ट बोर्ड, शिक्षकांना प्रशिक्षण देणारी संस्था स्थापन करुन शिक्षकांचे शिकवणे निरीक्षण करणे, आर्थिकदृष्ट्या कमी सक्षम उत्पन्न गटातील मुलांसाठी निवासी शाळांची संख्या वाढवणे महत्त्वाचे आहे.

- **विवेक पंडित**, संचालक, विद्यानिकेतन शाळा



केंद्र सरकारने शिक्षणावरचा खर्च कमी केला आहे. तो ६ टक्के असावा, असे तज्ज्ञांचे मत आहे. मात्र सहा वर्षांमध्ये तो अवघा ३.५ टक्के आहे. गेल्या वर्षभरात मुले घरुनच अभ्यास करत आहेत. या वर्षात दर्जेदार शिक्षणासाठी तरतूद व्हायला हवी.

- **संजय मंगला गोपाळ**, शिक्षणतज्ज्ञ



शिक्षण क्षेत्रासाठी योग्य तरतूद असली पाहिजे. सरधोपट शिक्षणापेक्षा वेगळ्या योजना राबविल्या पाहिजेत. ऑनलाइन शिक्षणाच्या दृष्टीने मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला पाहिजे.

- **सुचित्रा नाईक**, प्राचार्य, जोशी-बेडेकर महाविद्यालय

ठाणे वैभव

२१ जाने. २०२१.

# ज्ञानसाधना महाविद्यालयाकडून गुंतवणूक जागरूकता सप्ताह

**ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज ठाणे शिक्षण क्षेत्रात 40 वे वर्ष साजरे करत आहे. या निमित्ताने, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थ्यांद्वारे 40 भिन्न वेबिनार आयोजन करीत आहे. महाविद्यालयातील 'बँकिंग अँड इन्शूरन्स' व 'अकाउंट अँड फायनान्स' हे दोन विभाग एकत्रितपणे 'गुंतवणूक जागरुकता सप्ताहाचे' आयोजन करीत आहे.**









गौरवशाली 40 कार्यक्रमांतर्गत नोकरी-व्यवसायातील नवोदितांसाठी हा कार्यक्रम एक उत्तम मार्गदर्शक ठरेल. सर्व विद्याशाखा (वाणिज्य, विज्ञान, कला आणि स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रम) मधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम दि.18 जानेवारी ते 25 जानेवारीपर्यंत निर्धारित आहे. दररोज, बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील नामांकित वक्ते त्यांचे बहुमोल ज्ञान आणि कौशल्य आमच्या विद्यार्थ्यांसमोर सामायिक करीत आहेत. वेबिनार सप्ताहात बँकेतील गुंतवणूकीचे मार्ग, म्युच्युअल फंड, रिअल इस्टेट गुंतवणूक, शेअर बाजाराचे मार्गदर्शन, बॉन्ड्स आणि डेरिव्हेटिव्ह्ज आणि आरोग्य व जीवन विमा हे विषय आहेत. हा कार्यक्रम एमएस-टीमच्या साहाय्याने यूट्यूबवर थेट प्रसारित केला जातो. बचत व गुंतवणूकीची सवय विद्यार्थिदशेतच विकसित करणे तसेच गुंतवणूकीच्या विविध मार्गांची जाणीव निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

आम्हाला असे वाटते की सध्याची तरुणाई गुंतवणूकीच्या मार्गांविषयी निष्काळजी होत आहे. कोरोनामुळे उद्भवलेल्या संकटकाळात आपणा सर्वांनाच निधी व्यवस्थापित करण्याचे महत्त्व कळले आहे.

कुठल्याही आपत्तीजन्य परिस्थितीत आपल्याला आर्थिक अडचण भासू नये, यासाठी योग्य वेळीच बचतीचे महत्त्व कळायला हवे. विद्यार्थ्यांमध्ये अर्थबचतीविषयी अपेक्षित जागृती निर्माण करण्यासाठी हे वेबिनार नक्कीच साहाय्यभूत ठरेल, असे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

लोकमत

दि. १७ फेब्रु. २०२१.

# ग्रीन अँड क्लीन एनर्जी स्पर्धेमध्ये ज्ञानसाधना महाविद्यालय अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटने 'भारत पेट्रोलियम संरक्षण संशोधन संघटनेच्या (पीसीआरए)' सहकार्याने 'ग्रीन अँड क्लिन एनर्जी' थीम आंतरमहाविद्यालयीन वॉल पेंटिंग स्पर्धा आयोजित केली. ठाणे शहरातील विविध महाविद्यालयांतील पाच संघ होते. या स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांकाचा मान मिळविला. या संघात शिवानी पाल, शिवानी मिश्रा, आयुष सरतापे, श्रेया कोलवणकर, नेहा सोनी या विद्यार्थ्यांचा समावेश होता.



स्पर्धेचा प्रारंभिक बक्षीस समारंभ महाविद्यालयाच्या आवारात ज्ञानसाधना, ठाणे (सोसा.) चे सचिव कमलेश प्रधान, कोषाध्यक्ष सतीश शेठ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत चित्ते, उपप्राचार्या प्रा. प्रज्ञा कानविंदे आणि पीसीआरएची टीम यांच्या उपस्थितीत पार पडला. सोमवारी पीसीआरएच्यावतीने यशवंतराव चव्हाण सभागृहात वर्ष २०२१ साठी 'हरित व स्वच्छ ऊर्जा' या थिम अंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल रेशनिंग कंट्रोलर व नागरी पुरवठा संचालक कमलेश पगारे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले एनएनएस प्रमुख प्रा. सुरेश हलबांडगे आणि सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सदर उपक्रमात विद्यार्थ्यांना प्रा. शंकर झंजे, प्रा. विजयश्री भोर, प्रा. प्रीती निकते, डॉ. वंदना शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

ठाणे वैभव
दि. १८/२/२०२१.

# "ग्रीन अँड क्लीन एनर्जी"स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय अव्वल




**ठाणे: सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या एन.एस.एस. युनिटने "भारत पेट्रोलियम संरक्षण संशोधन संघटनेच्या (पीसीआरए)" सहकार्याने "ग्रीन अँड क्लीन एनर्जी" थीम आंतरमहाविद्यालयीन वॉल पेंटिंग स्पर्धा आयोजित केली होती. ठाणे शहरातील विविध महाविद्यालयातील पाच संघ होते. सदर स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांकाचा मान मिळविला. या संघात शनी पाल, शिवानी मिश्रा, आयुष सरतापे, श्रेया कोलवणकर, नेहा सोनी या विद्यार्थ्यांचा समावेश होता.**

सदर स्पर्धेचा प्रारंभिक बक्षीस समारंभ महाविद्यालयाच्या आवारात ज्ञानसाधना,ठाणे (सोसा.) चे सचिव कमलेश प्रधान, कोषाध्यक्ष सतीश शेठ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत चित्ते, उपप्राचार्या प्रा.प्रज्ञा कानविंदे आणि पीसीआरएची टीम यांच्या उपस्थितीत पार पडला. 15 फेब्रुवारी रोजी पीसीआरएच्या वतीने मंत्रालयासमोर असलेल्या यशवंतराव चव्हाण सभागृहात वर्ष 2021 साठी "हरित व स्वच्छ ऊर्जा" या थीम अंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल कैलास पगारे, (रेशनिंग कंट्रोलर व महाराष्ट्र शासनाच्या नागरी पुरवठा संचालक.) यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले एन.एन.एस. प्रमुख प्रा.सुरेश हलबांडगे आणि सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

उपक्रमाच्या नियोजनात व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रा.शंकर झंजे, प्रा. विजयश्री भोर, प्रा.प्रिती निंकते, डॉ.वंदना शिंदे, प्रा.निषाद पवार, प्रा.महेश पाटील यांनी मोलाची भूमिका निभावली.

लोकसत्ता 24-02-2021

### प्रत्यक्ष उपस्थितीवरील निर्बंध, प्रायोजकत्व मिळण्यात अडचणींमुळे निर्णय

# महाविद्यालयांचे महोत्सवही यंदा ‘ऑनलाइन’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनामुळे यंदा शैक्षणिक वर्ष लांबल्याने दरवर्षी डिसेंबरमध्ये होणारे महाविद्यालयीन महोत्सव यंदा फेब्रुवारीत पार पडत आहेत. राज्यातील अनेक भागात महाविद्यालये सुरू झाली तरी मुंबईतील महाविद्यालये बंदच आहेत. त्यामुळे यंदा बहुतेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून महोत्सव आयोजित करण्याचा पर्याय स्वीकारला. प्रायोजकत्व मिळण्यास अडचणी, तसेच अभ्यास, परीक्षा यांचा योग्य मेळ साधत विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या सहकार्याने महोत्सवांचे आयोजन केले.

लांबलेल्या शैक्षणिक वर्षामुळे डिसेंबर- जानेवारी महिन्यात विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात आल्या. त्यामुळे अनेक महाविद्यालयांनी डिसेंबरमध्ये होणारे महोत्सव फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्याचे ठरवले, तर काहींनी आयोजन करण्याचे टाळले. दूरदृश्य पद्धतीने आयोजित केलेल्या महाविद्यालयीन महोत्सवात गायन, नृत्य, वादन या पारंपरिक स्पर्धांसोबतच चित्रफिती तयार करणे, छायाचित्रे, तज्ज्ञांचे ऑनलाइन मार्गदर्शन या कार्यक्रमांची रेलचेल पाहण्यास मिळाली.

रामनारायण रुईया महाविद्यालयाचा १८ ते २० फेब्रुवारी या कालावधीत पार पडलेल्या ‘आरोहण’ हा महोत्सवाची ‘नझरिया - अ वर्ल्ड थ्रू विंडो’ ही संकल्पना होती. या महोत्सवाचा एक भाग म्हणून करोना काळात जनतेची सेवा करणाऱ्या डॉक्टर, आरोग्य सेवक, परिचारिका यांचे मार्गदर्शन सत्र आयोजित केले. यावेळेस त्यांनी करोना काळात आलेले अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले. माटुंगा येथील पोदार वाणिज्य महाविद्यालयात ‘मॉनिटा’ हा अर्थविषयक महोत्सव नुकताच पार पडला. याचे उद्घाटन रुजुता कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या महोत्सवात तज्ज्ञांनी पैशांचे नियोजन कसे करावे, ते कोणत्या गोष्टीत गुंतवावे तसेच विविध विमा योजना या गोष्टीविषयी मार्गदर्शन केले.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात ‘बँकिंग अँण्ड इन्शुरन्स’ तसेच ‘अकाऊंटिंग आणि फायनान्स’ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ते २५ जानेवारी या कालावधीत ‘इनव्हेस्टमेंट्स अवेरनेस वीक’चे आयोजन केले होते. यावेळेस विद्यार्थ्यांनी गुंतवणुकीचे मार्ग, रिअल इस्टेट गुंतवणूक, शेअर बाजार, बॉण्डस, डेरिव्हेटिव्हज, आणि आरोग्य जीवन विमा या विषयांवर मार्गदर्शन केले. यानंतर नुकताच ज्ञानसाधना महाविद्यालयाचा ‘युटोपिया’ हा महोत्सवही यशस्वीरीत्या पार पडला. छोट्या पडद्यावरील अभिनेत्री श्रेया बुगडे हिच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यात चेहरा रंगवणे, मेहेंदी, नृत्य, गायन, रांगोळी, अंड्यावर कलाकृती साकारणे, मुखपट्टया रंगवणे या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.



### जोशी बेडेकरमधील महोत्सव उत्साहात

ठाण्यातील जोशी बेडेकर महाविद्यालयाचा ‘नवरंग’, ‘क्रिसिलिस’ आणि ‘गंधर्व’ हे तीन महोत्सव १६ ते १८ फेब्रुवारी या तीन दिवसाच्या कालावधीत पार पडले. करोनाच्या पार्श्वभूमीवर राखेतून भरारी घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याची संकल्पना महोत्सवासाठी ठरवण्यात आली. याला पाच हजारांहून जास्त प्रेक्षकांनी ऑनलाइन हजेरी लावली. लवकरच मार्चमध्ये जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले ‘त्र्य’ हे वर्तमानपत्र प्रकाशित करण्यात येईल. ‘यंदा परीक्षांचे वेळापत्रक सांभाळून महोत्सवांचे आयोजन करणे आव्हानात्मक होते. कारण एका वेळेस ऑनलाइन सत्र सांभाळून प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना महोत्सवाचेही नियोजन करायचे होते. महोत्सव दूरदृश्य पद्धतीने आयोजित करायचे असल्याने सर्वांना तांत्रिक गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आल्याचे जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी सांगितले.

-2 MAR 2021

-2 MAR 2021

लोकमत

# 'ज्ञानसाधना'च्या वतीने आज 'राजभाषा गौरव दिन'

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : शहरातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या ४० वर्षपूर्ती निमित्ताने 'ग्लोरियस ४०' या मथळ्याअंतर्गत विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यासाठी आभासी मंचावर विविध विषयांवरील ४० कार्यक्रम आयोजित केले आहेत. या कार्यक्रम शृंखलेतील ३३ वा कार्यक्रम 'मराठी राजभाषा गौरव दिन' २ मार्च रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील वाङमय मंडळाच्यावतीने होणार आहे.

या कार्यक्रमाचे पहिले पुष्प सकाळी १० वा. के.जे.सोमय्या महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सुचेता नलावडे या 'साहित्यसूर्य कुसुमाग्रज' या विषयावरील व्याख्यानातून गुंफणार आहेत. तसेच दुसऱ्या पुष्पात दुपारी १:३० वा. 'पॉकेटफुल ऑफ स्टोरीज - एक मनमुक्त संवादमैफल' याविषयावर अभिनेत्री तितिक्षा तावडे यांच्याशी प्रा.महेश कुलसंगे मनमुक्त संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेप्रण महाविद्यालयाच्या यू ट्यूब, फेसबुक या माध्यमातून होणार आहे.

विद्यार्थी, शिक्षक तसेच इतर इच्छुकांनी https://forms.gle/Jbrj4aYAMyLdm3Kj6 या गुगल फॉर्मच्या दुव्याच्या साहाय्याने नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत
दि. - 22/3/2021

ठाणेकरांनी केले २२ मार्च २०२० चे अनुभवकथन

# जनता कर्फ्यू आजही आठवतोय, भीतीने झाली होती दिवसाची सुरुवात

**ठाणे : २२ मार्च २०२० रोजी जनता कर्फ्यू जाहीर करण्यात आला. भीतीने या दिवसाची सुरुवात झाली होती. एक दिवसच घरात बसावे लागेल असे नागरिकांना वाटत होते. परंतु ही समजूत चुकीची होती, हे नंतर लक्षात आले. त्या दिवशी भयाण शांतता, फक्त पक्ष्यांचे आवाज ऐकू येत होते. आज या दिवसाला एक वर्ष पूर्ण होत आहे, त्याबद्दल ठाण्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपले अनुभवकथन केले.**

कधी कल्पना केली नव्हती असा दिवस गेल्या वर्षी २२ मार्च रोजी अनुभवला. फेब्रुवारी २०२० च्या अखेरीस एक नवा संसर्गजन्य रोग आला आहे आणि दुबई, युरोपमध्ये त्याचे रोगी आढळले आहेत हे कळलं होतं. पण भारतावर हे संकट येईल, असे वाटले नव्हते. याआधी सार्स, बर्ड फ्लू आले. पण भारतावर फार परिणाम झाला नव्हता. त्यामुळे या कोविड १९ चा ही होणार नाही असा समज होता. हा समज किती चुकीचा होता, हे पुढच्या काही महिन्यांत समजलं. २२ मार्च २०२० रोजीचा जनता कर्फ्यू मागे लागला तो अगदी २०२० साल संपेपर्यंत. बरे-वाईट (वाईटच जास्त) अनुभव सगळ्यांनाच आले. आज वर्षानंतरही जगाचे व्यवहार सुरळीत चालू झालेले नाहीत. कधी होतील- कसे होतील माहिती नाहीत. भविष्य फार आशादायी नाही. मात्र तरीही लोकांची जगण्याची उमेद खचलेली नाही.

**- मकरंद जोशी**, पर्यटन व्यावसायिक

एक दिवस होईल लॉकडाऊन असा विचार करून सुरु झालेला हा प्रवास पूर्ण वर्षभर चालला. खूप कठीण काळ होता सगळ्यांसाठी. परंतु यातून पण आपल्याला खूप शिकायला मिळाले. आपण सगळे एकत्र आलो. सगळ्यांनी मिळून या कठीण परिस्थितीत अनेक मार्ग काढले. मुलांनी वर्षभर ऑनलाइन शिक्षण घेतले. आपण थांबलो नाही, पुढे सरकत राहिलो. अजूनही कोविड आपल्या आजूबाजूला असला तरी आपण सर्वजण यामधून सुखरूप बाहेर पडू.

**- मानसी प्रधान**, सहसचिव, ज्ञानसाधना महाविद्यालय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोना महामारीमुळे जनता कर्फ्यू पुकारल्याचे जाहीर केले, तेव्हा हा कर्फ्यू एका दिवसाचा आहे की अजून काही दिवस गंभीर परिस्थिती निर्माण होणार या भीतीने दिवसाची सुरुवात झाली. पण दुपारपर्यंत दूरदर्शनवर विविध बातम्या बघितल्या व हा काहीतरी भयंकर आजार आहे, याची कल्पना आली. दुपारनंतर लक्षात आले की, आपण एका मोठ्या महामारीला सामोरे जात आहोत. जशी १९२० साली प्लेगची साथ आली होती तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे, याची कल्पना झाली.

**- प्रा. एकनाथ पवळे**, अध्यक्ष, निसर्ग क्रीडा संवाद, ठाणे.

२२ मार्च २०२० रोजी मी दुपारी १ वाजता गोडबोले हॉस्पिटलजवळून जेवणाचा डबा आणायला गेलो होतो. त्या जेवण देणाऱ्या ताई म्हणाल्या, काही बँकेच्या अधिकाऱ्यांनाही जेवणाचे डबे देत आहे. घरापासून लांब नोकरी करणाऱ्यांचे कसे होईल? आता? जे सामान भरले आहे ते संपेपर्यंत जेवणाचे डबे देऊ शकेन. आता? रस्त्यावर चिटपाखरूही नाही. कसे होणार? मी नौपाडा पोलीस स्टेशनवरून पुढे आलो, जागेजागेवर पोलीसच दिसत होते. बाईकला अडकवलेली पिशवी पाहून त्या पोलिसांने माझ्याकडे पाहून न पाहिल्यासारखे केले. घरी आल्यावर विचार आला की आपल्याला तर जेवण मिळेल ,पण हजारो लोक दुपारी वडापाव, मिसळपाव खाऊन राहतात त्यांचे काय होईल? कुठे जातील ते? बाहेर पडायला त्यांच्याकडे ना आयकार्ड ना कसला पुरावा? जनता कर्फ्युमध्ये सर्वात भरडला जाणार तो हाच वर्ग ! त्या भयाण शांततेने एक उदासी दिली.

**- प्रा. संतोष राणे**, प्रकाशक

संग्रहित



२२ मार्च २०२० ही तारीख कोणताही भारतीय नागरिक कधीही विसरू शकणार नाही. पंतप्रधानांनी केलेल्या जनता कर्फ्यूच्या आवाहनाने नागरिक काहीसे भांबावले होते व घाबरलेही होते. त्यादिवशी केवळ रस्त्यांवरच नव्हे तर मनामनात भयाण शांतता होती. कोरोनाचा विळखा आपल्याभोवती घट्ट होत चालला आहे याची जणू त्यादिवशी नांदीच होत होती. एरवी उत्साहाने ओतप्रोत भरलेला आमचा ब्रम्हांड कट्टा त्यादिवशी काहीसा निरस झाला होता. कारण २१ मार्च हा आमचा वर्धापन दिन सोहळा रद्द करावा लागला होता व ऑनलाइन तंत्र फारसे प्रचलित नव्हते. आज - वर्षानंतर कोरोनाच्या या समस्येने परत तोंड वर काढले आहे. मनात भीती तर आहेच परंतु आज ऑनलाइन माध्यमातून आम्ही उत्साहाने आमचा वर्धापन दिन साजरा करणार आहोत. कोरोनाचे हे संकट लवकरात लवकर टळू दे.

**- राजेश जाधव**, संस्थापक, ब्रह्मांड कट्टा परिवार

आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नका, असे शब्द कधी ऐकावे लागतील असा विचारदेखील कोणी केला नव्हता. हा जनता कर्फ्यू देशभर लागू करण्यात येणार आहे. जनतेने सरकारी कर्मचाऱ्यांविषयी आदराची भावना ठेवून यात सहभाग घ्यावा, असे पंतप्रधान आणि मुख्यमंत्री म्हणाले. जनता कर्फ्यूबद्दल अनेक जण ट्वीट करत होते. व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीमधून मार्गदर्शन होत होते. २२ मार्च २०२० हा आमच्या आयुष्यातील अभूतपूर्व दिवस होता. संकटावर मात कशी करायची या चिंतेने सर्व जग ग्रासले असताना आम्हाला दोन्ही बाजूनी संकटानी घेरले होते. पण काही माणसांनी दाखवलेल्या माणुसकीने, मित्र-मैत्रिणींनी पुढे केलेल्या मदतीच्या हाताने या संकटातून तारले. कोरोनामध्ये माणुसकी काय असते, हे शिकवले. आपण माणूस असल्याची जाणीव करून दिली, हे नाकारता येत नाही. पण जनता कर्फ्यूच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. आजच्या दिवशी एक वर्षानेदेखील काटा उभा राहतो अंगावर, हे सर्व आठवून.

**- संध्या सावंत**, संस्थापिका, मातृसेवा फाउंडेशन

लोकमत
५ मे. २०२१

'मुंतजीर' उतरली प्रेशकांच्या पसंतीस

# 'ज्ञानसाधना'च्या विद्यार्थ्यांनी बनविली वेबसिरीज

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : कोणतीही कला माणसाला स्वस्थ बसू देत नाही. लॉकडाऊनमध्ये एकांकिका बंद झाल्याने ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी चक्क वेबसिरीज बनविण्याचा निर्णय घेतला. वर्गणी करून, तसेच वरिष्ठांची मदत घेत या मुलांनी 'मुंतजीर' ही आगळीवेगळी वेबसिरीज बनवून किमया घडविली. विशेष म्हणजे ती प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडल्याने त्यांच्या मेहनतीचे सोने झाले.



या वेबसिरीजमध्ये आम्ही एका कलाकाराची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. एका कलाकारासाठी त्याची कला किती महत्त्वाची असते, याची जाणीव आम्हाला होती, हीच जाणीव इतरांना करून देण्याचा प्रयत्न आम्ही 'मुंतजीर' या वेबसिरीजमधून केला आहे.

- चेतन पाटील

लॉकडाऊन काळात वेबसिरीज सर्वाधिक पाहिल्या जात आहेत. त्यामुळे आपणही वेबसिरीज बनवावी, असे या विद्यार्थ्यांच्या मनात आले; परंतु वेबसिरीज बनविणे हे या मुलांसाठी आव्हान होते. अंगी असलेली कला आणि स्वतःवरचा आत्मविश्वास यांचा मेळ साधत या विद्यार्थ्यांनी हे आव्हान पेलण्याचे ठरविले आणि वर्गणी करून त्यांनी या वेबसिरीजचा श्रीगणेशा केला. मुंतजीर या वेबसिरीजचे लिखाण अजय पाटील, मनीष साठे यांनी केले आहे.

लोकेशनसाठी आम्हाला दिग्दर्शक मंदार देवस्थळी यांनी, तर पैशांची अडचण निर्माण झाली तेव्हा स्निग्धा सबनीस, ऋषिकेश म्हात्रे यांनी मदत केली. एडिटिंगसाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी उमेश ढोबळे यांनी स्टुडिओ दिला. या वेबसिरीजचा अभिप्राय त्यांनी महाविद्यालयाच्याच वरिष्ठांकडून घेतला. 'मुंतजीर' प्रेक्षकांच्या चांगली पसंतीस पडली असून, इंडियाच्या टॉप टीव्ही सिरीजमध्ये ही वेबसिरीज पहिल्या क्रमांकावर आहे, असे प्रॉडक्शनची बाजू सांभाळणाऱ्या चेतन पाटील याने सांगितले. वेबसिरीजचे छायाचित्रण सूरज घोरपडे, संकलन अजय आणि सूरज, मेकअप समता ब्राह्मी, साक्षी मणचेकर, तर प्रॉडक्शन टीम मंदार कामठे, कुशल मराठे, श्वेता रेमबुळकर, अदिती जामदारे, संजय गोसावी यांनी सांभाळली आहे. याआधी 'मेमरीज ऑफ लव्ह' ही वेबसिरीज गेल्या वर्षी बनविली होती. ती 'यू ट्यूब'वर अपलोड केली होती. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आणि फोर्थ वॉल, ठाणे या आमच्या संस्थेतून सहा वर्षे एकांकिका करतोय, असे चेतनने सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स
८ मे २०२१

# चर्चा 'मुंतजीर' वेब सीरिजची

**शायर असणाऱ्या कलाकाराचं आयुष्य कसं असेल, त्याची कला त्याच्यासाठी किती महत्त्वाची असते हे दाखवणाऱ्या 'मुंतजीर' या वेब सीरिजची सध्या चर्चा आहे. विशेष म्हणजे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थ्यांनी या वेब सीरिजची निर्मिती केली आहे.**

मुंबई टाइम्स टीम
muntainbox@gmail.com

एका कलाकारासाठी त्याची कला किती महत्त्वाची असते याची जाणीव इतरांना करून देण्याचा प्रयत्न 'मुंतजीर' या नव्या वेब सीरिजमधून करण्यात आला आहे. शायर असणाऱ्या कलाकाराचे जीवन यामधून रेखाटण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ही वेब सीरिज नुकतीच प्रदर्शित झाली असून याची निर्मिती ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थ्यांनी 'फोर्थ वॉल प्रोडक्शन' या आपल्या संस्थेमार्फत केली आहे.

सच्च्या कलाकाराला स्वस्थ बसता येत नाही या उक्तीप्रमाणे या विद्यार्थ्यांनी करोना काळात सगळी काळजी घेऊन युट्यूबवर 'मेमरीज ऑफ लव्ह' या नावाची वेब सीरिज केली होती. त्याला मिळालेला उत्तम प्रतिसाद लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांनी 'मुंतजीर'ची निर्मिती करण्याचं ठरवलं.



या वेब सीरिजचं लेखन आणि दिग्दर्शन अजय पाटील, मनीष साठे यांचं असून वेब सीरिजमध्ये त्या दोघांनीच अभिनय केला आहे. छायाचित्रणाची बाजू सूरज घोरपडेनं सांभाळली आहे. 'मुंतजीर'चं संकलन अजय आणि सूरज यांनी केलंय तर चेतन पाटील आणि भरत पाटील यांनी कार्यकारी निर्माता म्हणून काम पाहिलं.

चित्रीकरण स्थळ, आर्थिक अडचणी, स्टुडिओ, प्रसिद्धी अशा अनेक कामांमध्ये या विद्यार्थ्यांना समस्यांना तोंड द्यावं लागलं. पण हार न मानता हिंमतीनं करोनाच्या काळात रसिकांचं मनोरंजन करण्याच्या हेतूनं त्यांनी जिद्दीनं 'मुंतजीर'ची निर्मिती केली. 'अनेक संहिता वाचल्यानंतर आम्हाला 'मुंतजीर'ची संकल्पना आवडली. एका कलाकाराचं आयुष्य लोकांपर्यंत आणण्याच्या उद्देशानं आम्ही ही वेब सीरिज तयार केली. अनेक चांगल्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत येत आहेत. या सगळ्या प्रवासात अनेकांनी मदत केली. यापुढेही आमच्या 'फोर्थ वॉल प्रोडक्शन' संस्थेमार्फत चांगले विषय हाताळण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे', अशी माहिती चेतनने दिली. दिग्दर्शक मंदार देवस्थळी, स्निग्धा सबनीस, ऋषिकेश म्हात्रे, सचिन यादव, वैभव उबाळे, उमेश ढोबळे अशा अनेकांनी या विद्यार्थ्यांना मोलाचं सहकार्य केलं.